# संत साहित्यातील मानवता आणि पर्यावरण मूल्ये

डॉ. नानासाहेब पवार(प्रोफेसर, मराठी विभाग)
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड . पुणे -३८.
ई–मेल :npnanapawar5@gmail.com मो.नं. ७८७५०६९८७७

---

भारतीय सांस्कृतिक परंपरेमध्ये संत साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रातील भक्ती चळवळीमुळे उदयास आलेले संत साहित्य हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक साहित्य नसून ते सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे आणि मानवी मूल्यांना अधोरेखित करणारे साहित्य आहे. संतांनी आपल्या अभंग, ओव्या, भारुड आणि प्रवचनांच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, जातिभेद, विषमता आणि अन्याय यांचा विरोध केला. त्यांनी मानवतेचा, समतेचा, करुणेचा आणि बंधुत्वाचा संदेश देत समाजाला नवी दिशा दिली. संत साहित्याची निर्मिती ज्या मध्ययुगीन काळात झाली त्या काळात समाजात अनेक प्रकारच्या सामाजिक आणि धार्मिक विसंगती होत्या. जातीभेद, अस्पृश्यता, कर्मकांड आणि धार्मिक आडंबर यामुळे समाजातील सर्वसामान्य माणूस त्रस्त झाला होता. अशा परिस्थितीत संतांनी लोकभाषेतून विचार मांडून सामान्य माणसाला आध्यात्मिकतेचा आणि नैतिकतेचा मार्ग दाखविला.संत साहित्याचा गाभा हा मानवतेच्या विचारावर आधारलेला आहे. संतांच्या मते प्रत्येक मानव हा परमेश्वराचा अंश आहे आणि त्यामुळे सर्व मानव समान आहेत. या विचारामुळे संत साहित्यामध्ये सामाजिक समतेचा आणि बंधुत्वाचा प्रभावी संदेश दिसून येतो. त्याचबरोबर संतांच्या विचारांमध्ये निसर्ग आणि सृष्टीबद्दलही अत्यंत संवेदनशील दृष्टिकोन दिसतो. त्यांनी निसर्गाला ईश्वराचे रूप मानले आणि निसर्गाशी सुसंवाद राखण्याचा संदेश दिला.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर झाले असले तरी पर्यावरणावर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. जंगलतोड, जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि हवामान बदल यांसारख्या समस्यांमुळे संपूर्ण जग चिंतेत आहे. अशा परिस्थितीत संत साहित्यामधील मानवता आणि पर्यावरण मूल्यांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. म्हणूनच संत साहित्यातील मानवता आणि जीवनमूल्ये हा शोधनिबंधाचा आणि संशोधन शिस्तीचा भाग म्हणून अभ्यासण्याचा प्रयत्न करीत आहे.

संतांचे विचार मानवाला नैतिक जीवन जगण्याची प्रेरणा देतात आणि निसर्गाशी सुसंवादी संबंध राखण्याची शिकवण देतात. ही भावना आणि विचार केंद्रस्थानी ठेऊन विविध संताच्या साहित्यातील भूमिका केंद्रस्थानी ठेऊन मांडणी करीत आहे, खरतर मराठी संत साहित्याची परंपरा साधारणपणे तेराव्या शतकात सुरू झाली. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या माध्यमातून भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान मराठी भाषेत समजावून सांगितले आणि मराठी संत साहित्याचा पाया घातला. त्यानंतर संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई आणि संत बहिणाबाई यांसारख्या संतांनी आपल्या साहित्याद्वारे भक्ती, मानवता आणि सामाजिक समतेचा संदेश दिला.संत साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील साधेपणा आणि लोकभाषेतील अभिव्यक्ती. संतांनी संस्कृतसारख्या अभिजात भाषेऐवजी सर्वसामान्य लोकांना समजेल अशा मराठी भाषेत आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यामुळे संत साहित्य हे लोकसाहित्याशी जोडले गेले आणि समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचले.

संत साहित्यामध्ये अभंग, ओवी, भारुड, कीर्तन आणि प्रवचन या विविध प्रकारांचा समावेश होतो. या साहित्यप्रकारांमधून संतांनी अध्यात्मिक विचार मांडताना समाजातील नैतिक आणि सामाजिक प्रश्नांवरही भाष्य केले. संत साहित्यामुळे समाजात जागृती निर्माण झाली आणि मानवतेचा विचार दृढ झाला.

मानवता म्हणजे सर्व मानवांबद्दल प्रेम, सहानुभूती आणि करुणा बाळगणे. संतांच्या मते खऱ्या धर्माचा अर्थ म्हणजे माणसावर प्रेम करणे आणि त्याच्या दुःखात सहभागी होणे.मध्ययुगीन समाजात जातीभेद आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. समाजातील काही घटकांना अस्पृश्य मानले जात होते आणि त्यांना सामाजिक जीवनात स्थान नव्हते. संतांनी या विषमतेचा तीव्र विरोध केला आणि सर्व मानव समाज समान आहे हा विचार आपल्या साहित्यातून आणि कृती वृत्तीतून मांडला.

संत तुकारामांच्या अभंगांमध्ये मानवतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. ते म्हणतात की समाजातील दुःखी आणि पीडित लोकांशी आपुलकीने वागणे हीच खरी भक्ती आहे. त्यांच्या अभंगांमधून करुणा आणि सहानुभूतीचे महत्त्व अधोरेखित होते.संत एकनाथांनी आपल्या जीवनातून मानवतेचा आदर्श घालून दिला. त्यांनी अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या लोकांशी समानतेने वागून सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या साहित्यामध्ये करुणा, सहिष्णुता आणि मानवतेचा विचार स्पष्टपणे दिसतो.संत चोखामेळा आणि संत जनाबाई यांनी आपल्या साहित्यामध्ये समाजातील विषमता आणि अन्याय यांचे वास्तव चित्रण केले. त्यांच्या अनुभवातून व्यक्त झालेला स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार संत साहित्याच्या मानवतावादी परंपरेला अधिक बळकटी देतो. मराठी साहित्याच्या इतिहासात संत साहित्य हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावी प्रवाह आहे. साधारणपणे १३व्या शतकापासून महाराष्ट्रात भक्ती चळवळीचा उदय झाला. या चळवळीमुळे समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत धर्म आणि अध्यात्म पोहोचले.संतांनी संस्कृतसारख्या अभिजात भाषेऐवजी लोकभाषेचा वापर करून आपल्या विचारांची अभिव्यक्ती केली. त्यामुळे संत साहित्य सर्वसामान्य जनतेपर्यंत सहज पोहोचले.

मानवता म्हणजे सर्व मानवांबद्दल प्रेम, करुणा आणि सहानुभूती बाळगणे. संतांच्या मते प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचे अस्तित्व आहे. त्यामुळे सर्व जीवांवर प्रेम करणे हीच खरी भक्ती आहे.मध्ययुगीन काळात समाजात जातीभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. या पार्श्वभूमीवर संतांनी मानवतेचा आणि समतेचा विचार मांडून समाजात वैचारिक क्रांती घडवून आणली. संत ज्ञानेश्वर हे मराठी संत साहित्यातील आद्य संत मानले जातात. त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथामध्ये मानवतेचा आणि समतेचा संदेश दिला आहे.ज्ञानेश्वरांच्या मते सर्व मानव समान आहेत आणि प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचे अस्तित्व आहे. त्यांनी विशिष्ट समाज डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपले साहित्य निर्माण केले नाही. दलित, सवर्ण, ब्राह्मण, अंत्यज, गरीब, श्रीमंत, राजा, भिकारी, मूर्ख, विद्वान असा कोणताच भेद ज्ञानेश्वरांनी बाळगलेला नाही. “ 'कां फेडित पाप ताप । पोरवीत तीरीचे पादप । समुद्रा जाय आप / गंगेचे जैसे । कां जगाचे आंध्य फेडितु ।श्रियेची राउळे उघडितु । निघे जैसा भास्वतु। प्रदक्षिणे ।। तैसी बांधली फेडित । बुडाली काढीत । साकडी फेडित । आर्तांचिया ।।'” [१] गंगा अगदी सहजपणे आपल्या पवित्र जलाने कुणाचेही पाप-ताप हरण करते, काठावरच्या वृक्षांनाही ओलावा देते आणि प्रफुल्लित करत करत सागराला येऊन मिळते किंवा सूर्य ज्याप्रमाणे सर्व जगाचा अंधार नष्ट करून सर्वत्र प्रकाशाचे ऐश्वर्य निर्माण करतो त्याप्रमाणे ज्ञानेश्वर महाराजांसारखे संत या जगातील प्रत्येकाचे अज्ञान दूर करतात. संसाररूपी मायानदीत बुडणाऱ्यांना तारून नेतात आणि जे कुणी आर्त आहेत त्यांचे दुःख हरण करतात. हे सर्व सहजपणे आणि निरहंकार भावनेने संतांकडून घडते. 'मी कुणासाठी कांही केले' ही भावनाही त्यांचे ठिकाणी नसते. हा दलित किंवा हा सवर्ण वगैरे अशी कोणतीही भेददृष्टी संतांजवळ नसते. सर्व विश्वाचे कल्याण व्हावे ही ज्ञानदेवांची भूमिका त्यांच्या पसायदानात आढळते.

ज्ञानेश्वरांनी सांगितले की "जो जे वांछील तो ते लाहो / प्राणिजात" या पसायदानातील वचनातून सर्व जीवांच्या कल्याणाची भावना व्यक्त होते. थोडक्यात; विशिष्ट जात, धर्म, पंथ, भाषा, देश, लिंग डोळयासमोर ठेवून संतांनी साहित्य निर्माण केले नाही तर मानवजातीबद्दलचा खोल कळवळा ज्ञानदेवांच्या प्रत्येक कृतीत जाणवतो. प्रत्येक प्राणिमात्रांबद्दलची अपरंपार सहानुभूती ज्ञानदेवांच्या कृतीत जाणवते. ज्ञानेश्वरांच्या विचारांमध्ये सार्वभौम मानवतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश आढळतो.

संत नामदेवांच्या, अभंगात असणारी मानवी मूल्ये आणि जीवन मूल्ये मूर्तिमान होऊन विठ्ठलाच्या रूपाने अवतरली. या संदर्भात ते अभंगात लिहितात " 'अवघा संसार करीन सुखाचा। जरी झाला दुःखाचा दुर्धरू हा ।।' , 'बालक्रीडे'च्या अभंगात त्याचा 'एके ठायी करूनि अन्न। हातें वाढी नारायण ।।' , 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगीं ।।। [२] यातून सातशेहे वर्षापूर्वीचा महाराष्ट्रातील सहभोजनाचा हा क्रांतिकारक सोहळा संत नामदेवांचा पुरोगामी द्रष्टेपणा अधोरेखित करणारा आहे. ते 'बोलके' सुधारक नव्हते, तर 'कर्ते' सुधारक होते याचा विसर आजच्या जनसामान्यांना, अभ्यासकांना, विचारवंतांना आणि समाजसुधारकांनाही पडावा याचे दुःख वाटते !! 'घोषवाक्या'त आत्मोद्धार आणि लोकोद्धार यांचे युगपत जनजागरण असून मानवी संवेदनाच्या दृष्टीने हे अभंगचरण अधिक अर्थबोधात्मक आहेत.

संत तुकारामांचे अभंग हे मराठी संत साहित्यातील अत्यंत प्रभावी साहित्य आहे. त्यांच्या अभंगांमध्ये मानवतेचा, समतेचा आणि करुणेचा संदेश स्पष्ट दिसतो. तुकारामांनी समाजातील ढोंग, अहंकार आणि अन्याय यांवर कठोर टीका केली. त्यांच्या मते खऱ्या भक्तीचा अर्थ म्हणजे साधे आणि प्रामाणिक जीवन जगणे.
तुकाराम म्हणतात "जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले" या अभंगातून समाजातील दुःखी आणि पीडित लोकांबद्दल सहानुभूती व्यक्त होते. तुकोबांच्या तत्त्वज्ञानात भेदभावाला थारा नाही. वर्णजातींचा अडसर नाही. 'दया करणे जे पुत्रासी। ते चि दासा आणि दासी' अशी निखळ समतेची भूमिका ते घेतात. "'तुका म्हणे मी न वजे यातीवरी । या रे या रे लहानथोर । याति भलते नारी नर ।।वर्ण अभिमाने। कोण झाले पावन ।ऐसे द्या सांगून । मजपाशी ।।भेदाभेद भ्रम अमंगळ। तुका म्हणे विधि-निषेधाचे डोही।बुडाले त्यां नाही । देव कधी ।।'" [३] जातिभेद मानू नये, वर्णाचा अभिमान बाळगू नये अशा शिकवणीचा उल्लेख त्यांच्या अभंगांतून अनेकदा येतो. तुकोबांच्या करुणेत स्त्रीवर्गाला विशेष स्थान आहे. स्त्रीवर्गाबद्दल त्यांच्या मनात आदराचे ममत्व आहे. 'पराविया स्त्री' ते मातेसमान मानतात. स्त्रीचे आदर्श रूप त्यांना तिच्या 'आई' या भूमिकेत जाणवते. लेकराचे संगोपन करणारी माता त्यांना नेहमीच भावते. "'तुका म्हणे माता। वाहे तान्हेयाचि चिंता', 'लेकराचे हित। जाणे माऊलीचे चित्त', 'बाळा न मागता भोजन। माता घाली पाचारून', 'बाळाचे सोईने। घास घाली माता', 'आळविता बाळे। माते सुख ते आगळे'".[४] विठ्ठल भक्तीतला जिव्हाळा त्यांना अशा आईच्या दृष्टांतांनी नेहमी व्यक्त करावासा वाटला, यात त्यांचा स्त्रीरूपातल्या आदर्श 'मातें' बद्दलचा आदरभाव लक्षात येतो. असे कितीतरी अभंग आईच्या वात्सल्यभावाने रंगलेले आहेत. भारतीय स्त्रीदेखील तशी उपेक्षितच. दलितच. तिच्याबद्दलचा जिव्हाळा तुकोबांच्या अनेक अभंगातून ओसंडून वाहतो. मात्र ज्याप्रमाणे नीतिभ्रष्ट पुरुषांबद्दल तुकोबांना तिटकारा आहे, त्याप्रमाणेच अनीतिमान स्त्रियांबद्दलदेखील (व्यभिचारिणी, शिंदळी) ते नाराजी व्यक्त करतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

संत एकनाथांनी आपल्या जीवनातून आणि साहित्याद्वारे सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांनी अस्पृश्यतेचा विरोध करून समाजात समानतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एकनाथांच्या विचारांमध्ये करुणा, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश स्पष्ट दिसतो. संत साहित्यातील सर्वात महत्त्वाचा विचार म्हणजे मानवता. नाथांनी भागवताच्या एकादशस्कंधावर मराठीत केलेली टीका 'एकनाथी भागवत' म्हणून ओळखली जाते. लिहितात- ‘"आम्ही ब्रह्मकुळीचे ब्राह्मण। याति कुळ नाहीं लहान ॥ आम्हां सोवळे ओवळे नाहीं। विटाळ न देखो कवण्या ठायी ॥ आम्हां सोइरे जे जाहले । ते याति कुळा वेगळे केलें ॥ एका जनार्दनी बोधू । याति कुळींचा फिटला संबंधू ॥"’ [५] भागवतात अशा प्रकारचे अनेक उल्लेख दाखविता येतील. नाथांच्या वाङ्मयात आणि त्यांच्या आचरणात मानवतेचे सूत्र दिसते. मूळ वर्ण एकच असून चातुर्वर्ण्य नंतर अस्तित्वात आले असे भागवतात म्हटले आहे. अलीकडचा एखादा वाचक भागवतातील सर्व विवेचन वाचून नाथांनी जाती-वर्ण नाहीसा करण्यासाठी काय केले? हा संत एकनाथांनी मांडलेला धर्म, जात, पंथ किंवा वर्ग यांपेक्षा माणूस हा विचार महत्त्वाचा आहे.

गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी |" असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका." [६] अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. खरेतर समतेच्या सूर्योदयाची खबर घेऊन येणारे महापुरुष गाडगेबाबा होते.

मध्ययुगीन समाजात जातीभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. या पार्श्वभूमीवर संतांनी मानवतेचा आणि समतेचा विचार मांडून समाजात एक प्रकारची वैचारिक क्रांती घडवून आणली. संतांच्या विचारांमध्ये समतेला अत्यंत महत्त्व आहे. संतांनी सांगितले की प्रत्येक मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे आणि त्यामुळे सर्व मानव समान आहेत. संत चोखामेळा आणि संत जनाबाई यांसारख्या संतांनी आपल्या अनुभवातून सामाजिक विषमतेचा तीव्र विरोध केला. त्यांच्या साहित्यामध्ये माणसाच्या प्रतिष्ठेचा आणि स्वाभिमानाचा विचार आढळतो. संत तुकारामांनी आपल्या अभंगांमधून सामाजिक समतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते खऱ्या भक्तीचा अर्थ म्हणजे सर्व जीवांवर प्रेम करणे. मानवतेचा आधार म्हणजे प्रेम आणि करुणा. संतांच्या मते दया, क्षमा आणि परोपकार ही मानवी जीवनाची मूलभूत मूल्ये आहेत. संत एकनाथांनी आपल्या जीवनातून आणि साहित्याद्वारे करुणा आणि सहिष्णुतेचा आदर्श ठेवला. समाजातील दुर्बल आणि पीडित लोकांबद्दल सहानुभूती बाळगणे हीच खरी भक्ती आहे असे त्यांनी सांगितले. संत साहित्य समाजात ऐक्य निर्माण करणारे आहे. संतांनी लोकांना सांगितले की संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. मानवतेच्या या विचारामुळे समाजात बंधुता आणि सहकार्याची भावना निर्माण होते. संत साहित्य समाजाला नैतिक आणि आध्यात्मिक आधार देणारे ठरते.

तुकडोजी महाराजांच्या समतेच्या संवेदनेचा व्याप फार मोठा होता. म्हणून मग गावातल्या दीन-दलितांकडून ते जंगलाकडे वळतात. आदिवासी, गिरिवासी, वनवासी अशा जीवांची जीवनरीत ते न्याहाळतात. प्रस्थापित समाजाकडून होणारी त्यांची उपेक्षा त्यांना तीव्रतेने जाणवते. ‘"गरीब, जंगली आदिवासी जाती।

झाडपालेचि नेसोनि राहती। झाडाखालीच असते वसती। कित्येकांची। त्यासि बोलणे चालणे समजेना। भिवोनि पळती बघताचि आपणा । प्रेम लावोनि त्या कुटुंबांना। करावे आपण आपलेसे ।''' अशा वनवासी जीवांबद्दलची महाराजांची दलित संवेदना मग विधायक आचार, विचारधारा प्रगट करते. गिरिवासींकरता ग्रामीण-नागरी जनतेने काय काय करावे ते महाराज तपशीलवार सांगतात, 'काहींनी करावा आदिवासी सुधार। जावोनि रानी खेड्यांवर । पाहावे गरीब लोकांचे कुटीर। कैसे आहे।' पण केवळ पाहून त्यांनी स्वस्थ बसू नये. त्यांच्या सुधारणेकरता प्रत्यक्ष काही कार्य करावे म्हणून महाराज म्हणतात "'त्यांना औषधपाणी पुरवावे। लिहिणे वाचणेही शिकवावे । उत्सवी, सहभोजनी मिसळावे । कार्यकर्त्यांनी । जनी, भोजनी, मंदिरी। अस्पृश्यतेचीही न उरावी उरी । स्थान-मान सर्वतोपरी। एक करावे सर्वांचे ।''' [७] त्यांना आपल्या पातळीला आणावे. त्याकरिता त्यांच्यातील दोष जाणीवपूर्वक दूर करण्याचा यत्न करावा. आपले नि त्यांचे राहणीमान सारखे असावे याकरिता प्रयत्नशील असावे. आजवर आपण त्यांची उपेक्षा केली, म्हणून प्रायश्चित्तादाखल या वनवासी लोकांची सेवा करावी.

संत साहित्यामध्ये निसर्ग आणि सृष्टीबद्दल अत्यंत आदरभाव दिसून येतो. संतांच्या मते निसर्ग हा ईश्वराच्या सृष्टीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे निसर्गाशी सुसंवाद राखणे ही मानवाची नैतिक जबाबदारी आहे. संत ज्ञानेश्वरांच्या विचारांमध्ये संपूर्ण सृष्टी एकात्म आहे हा विचार दिसतो. त्यांच्या मते पृथ्वी, जल, वायु, अग्नी आणि आकाश ही पंचमहाभूते जीवनाची मूलभूत तत्त्वे आहेत. या तत्त्वांवर संपूर्ण सृष्टीचे अस्तित्व अवलंबून आहे.संत तुकारामांच्या अभंगांमध्येही निसर्गाचे वर्णन आढळते. त्यांनी निसर्गातील साधेपणा आणि संतुलन यांचा आदर्श मानवी जीवनासाठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले. संत सावता माळी आणि संत गोरा कुंभार यांसारख्या संतांच्या जीवनातूनही निसर्गाशी असलेले जवळचे नाते दिसून येते.त्यांच्या
" कांदा मुळा भाजी ।अवघी विठाई माझी ॥१॥लसूण मिरची कोथिंबिरी ।अवघा झाला माझा हरी ॥२॥ मोट नाडा विहीर दोरी ।अवघी व्यापिली पंढरी ॥३॥सावता म्हणे केला मळा ।विठ्ठल पायीं गोविला गळा ॥४॥ [८] तर "निर्गुणाचा संग धरिला जो आवडी ।तेणे केले देशोधडी आपणासी ॥१॥अनेकत्व नेले अनेकत्व नेले ।एकले सांडिले निरंजनी ॥२॥गोरा कुंभार म्हणे एकत्व पाहिले ।भेदाभेद गेले हरपुनी ॥३॥." [९] संत गोरा कुंभार यांचे मानवतावादी अभंग हे शेती, माती, वृक्ष आणि पाणी यांच्याशी जोडलेले त्यांचे जीवन पर्यावरणाशी सुसंवादाचे उदाहरण आहेत. संतांच्या मते सृष्टीतील प्रत्येक जीव महत्त्वाचा आहे. पशु, पक्षी आणि वनस्पती हे सर्व सृष्टीच्या संतुलनासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे संत साहित्यामध्ये जैवविविधतेचा आदर आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश स्पष्ट दिसतो. लोकभाषेचा वापर,सामाजिक समतेचा पुरस्कार,मानवतेचा संदेश,निसर्गाशी सुसंवाद,साधेपणा आणि नैतिक जीवनया वैशिष्ट्यांमुळे संत साहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरले.

संत साहित्य समाजातील नैतिक मूल्यांची जपणूक करते. संत साहित्यामुळे समाजात पुढील मूल्ये विकसित होतात. मानवता, समता, बंधुता, पर्यावरणाबद्दल जागरूकता ही मुल्याबद्दल संत साहित्यामध्ये अत्यंत संवेदनशील दृष्टिकोन दिसतो. संतांच्या मते सृष्टीतील प्रत्येक घटक हा परमेश्वराच्या अस्तित्वाचा भाग आहे. निसर्गाशी सुसंवाद राखणे हे मानवी जीवनासाठी आवश्यक आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. निसर्गाचे आध्यात्मिक महत्त्व करताना संत ज्ञानेश्वरांनी निसर्गाला ईश्वराचे रूप मानले. त्यांच्या विचारांमध्ये पृथ्वी, जल, वायु, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. निसर्गातील प्रत्येक घटक हा जीवनाचा आधार आहे. त्यामुळे निसर्गाचा आदर करणे आणि त्याचे जतन करणे आवश्यक आहे. संत साहित्यामध्ये वृक्ष आणि जलसंपत्तीचे महत्त्व वारंवार अधोरेखित केले गेले आहे. वृक्ष हे

जीवनाचे आधार आहेत. ते मानवाला अन्न, हवा आणि औषधे देतात. त्यामुळे वृक्षारोपणआणि वनसंवर्धन ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या संदर्भात अभंगात तुकाराम महाराज लिहितात "वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती ॥१॥ येणें सुखें रुचें एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ॥२॥ आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करूं ॥३॥ कंथा कमंडलू देह उपचारा। जाणवितो वारा अवसरु ॥४॥ हरि कथा भोजन परवडी विस्तार। करोनि प्रकार सेवू रुची ॥५॥ तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाची वाद आपणांसी ॥६॥." [१०] यातून झाडे-वेली, वनातील प्राणी आणि पक्षी हे आपले नातेवाईकच आहेत. म्हणजेच मानव हा निसर्गापासून वेगळा नसून त्याचाच एक भाग आहे. पक्ष्यांचे मधुर गाणे, जंगलातील शांतता आणि एकांत यामध्ये मनाला खरी शांती मिळते. येथे मानवाने निसर्गाशी सुसंवाद साधून जगावे हा संदेश आहे. तुकाराम महाराज पुढे सांगतात की आकाश हा मंडप आणि पृथ्वी हे आसन आहे. याचा अर्थ निसर्गच माणसाचे खरे घर आहे. साधे जीवन, कमी साधने आणि निसर्गाशी जवळीक यातच जीवनाचे समाधान आहे. वारा, पृथ्वी, आकाश या नैसर्गिक घटकांशी एकरूप होऊन मन आनंदाने क्रीडा करते.या अभंगाचा पर्यावरणीय विचार असा आहे की निसर्गाशी मैत्री, साधेपणा, संयम आणि पर्यावरणाबद्दल आदर ही जीवनाची खरी मूल्ये आहेत. झाडे, प्राणी, पक्षी आणि पृथ्वी यांना आपले नातेवाईक मानले तर पर्यावरणाचे संरक्षण आपोआप होईल. म्हणून हा अभंग मानव आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादी सहजीवनाचा आदर्श पर्यावरणवादी संदेश देणारा आहे.

संतांच्या मते प्रत्येक जीव हा सृष्टीचा अविभाज्य भाग आहे. पशु, पक्षी, वनस्पती आणि मानव यांचे अस्तित्व परस्परांवर अवलंबून आहे. या विचारामुळे संत साहित्यामध्ये जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित होते.

मानवतावादी आणि पर्यावरणीय विचार व्यक्त करण्यामध्ये संत ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वरी या ग्रंथात आध्यात्मिक तत्त्वज्ञानाबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय विचारही आढळतात. ज्ञानेश्वरांच्या मते संपूर्ण सृष्टी ही एकात्म आहे. माणूस आणि निसर्ग हे वेगळे नसून ते एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. त्यांच्या विचारांमध्ये निसर्गाशी सुसंवाद, साधेपणा आणि संतुलित जीवन यांचे महत्त्व स्पष्ट होते. संत तुकाराम हे त्यांच्या अभंगांमध्ये मानवी जीवनातील नैतिकता, प्रामाणिकपणा आणि करुणा यांचे महत्त्व सांगितले आहे. तुकारामांनी समाजातील अन्याय, ढोंग आणि अहंकार यावर कठोर टीका केली. त्यांच्या मते खऱ्या भक्तीचा अर्थ म्हणजे साधे आणि प्रामाणिक जीवन जगणे. त्यांच्या विचारांमधून मानवतेचा आणि सामाजिक समतेचा प्रभावी संदेश मिळतो.

आधुनिक काळातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर झाले आहे. परंतु या प्रगतीमुळे पर्यावरणावर मोठा परिणाम झाला आहे. प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि जैवविविधतेचा नाश या समस्या गंभीर होत आहेत. अशा परिस्थितीत संत साहित्यामधील पर्यावरणीय विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. संत साहित्य आपल्याला साधेपणा, संतुलन आणि निसर्गाशी सुसंवाद यांचे तत्त्व शिकवते. त्यामुळे आधुनिक समाजासाठी संतांचे विचार मार्गदर्शक ठरतात.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवाचे जीवन वेगाने बदलत आहे. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे पर्यावरणावर मोठा परिणाम होत आहे. जंगलतोड, जलसंकट, वायुप्रदूषण आणि हवामान बदल यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत.अशा परिस्थितीत संत साहित्यामधील पर्यावरणीय विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. संतांनी साधेपणा, संतुलन आणि निसर्गाशी सुसंवाद यांचे तत्त्व सांगितले आहे. हे तत्त्व आजच्या पर्यावरणीय संकटातून मार्ग काढण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.संत साहित्य मानवाला नैतिक जीवन जगण्याची प्रेरणा देते. मानवतेचा आणि पर्यावरणाचा समतोल राखणे हे संतांच्या विचारांचे मूलभूत तत्त्व आहे. त्यामुळे आधुनिक समाजासाठी संत साहित्य मार्गदर्शक ठरते.

**निष्कर्ष:**

संत साहित्य हे मराठी संस्कृतीचे आणि भारतीय समाजजीवनाचे एक अमूल्य सांस्कृतिक वारस आहे. संतांनी आपल्या साहित्याद्वारे मानवतेचा, समतेचा आणि करुणेचा संदेश दिला. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवून मानवतेचे मूल्य दृढ केले.त्याचबरोबर संतांनी निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल आदरभाव निर्माण केला. संतांच्या विचारांमध्ये माणूस आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादी नाते स्पष्ट दिसते.आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात संत साहित्यातील मानवता आणि पर्यावरण मूल्ये अधिकच महत्त्वाची ठरतात. संतांचे विचार मानवाला नैतिक आणि संतुलित जीवन जगण्याची दिशा देतात. त्यामुळे संत साहित्य हे केवळ आध्यात्मिक साहित्य नसून मानवतेचे आणि पर्यावरणाचे रक्षण करणारे वैचारिक साहित्य आहे.

संत साहित्य हे मराठी संस्कृतीचे आणि भारतीय समाजजीवनाचे एक अमूल्य सांस्कृतिक वारस आहे. संतांनी आपल्या साहित्याद्वारे मानवतेचा, समतेचा आणि करुणेचा संदेश दिला. त्याचबरोबर त्यांनी निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल आदरभाव निर्माण केला. संतांच्या विचारांमध्ये माणूस आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादी नाते स्पष्ट दिसते.

आजच्या पर्यावरण संकटाच्या काळात संत साहित्यातील मूल्ये अधिकच महत्त्वाची ठरतात. मानवतेचा आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी संतांचे विचार समाजाला दिशा देणारे आहेत.
म्हणूनच संत साहित्य हे केवळ भक्तीपर साहित्य नसून मानवतेचे आणि पर्यावरणाचे रक्षण करणारे वैचारिक साहित्य आहे.

**संदर्भ सूची :**

१. संत ज्ञानेश्वर,  ज्ञानेश्वरी. पुणे : वारकरी प्रकाशन. (ज्ञा. १६-९९ ते २०१)
२. संत नामदेव,  नामदेव गाथा. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. अभंग २९,२८,३०.
३.संत तुकाराम, तुकाराम गाथा. पुणे : वारकरी साहित्य मंडळ. अभंग क्र.८७
४. तत्रेव, पृ.२१९
५.संत एकनाथ,  एकनाथी भागवत. पुणे : साहित्य प्रसार केंद्र. पृ.६१
६. संत गाडगे महाराज “https:/mr.wikipidia.org
७. संत तुकडोजी महाराज, ‘ ग्रामगीता’. अ. २९-७०,७१, ७२, ७३,७४
८.. ढेरे, रा. चिं. मराठी संत साहित्य. पुणे : पद्मगंधा प्रकाशन. पृ.१७६
९. देशमुख, वि. स. वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन. पृ.७१
१०. संत तुकाराम, तुकाराम गाथा. पुणे : वारकरी साहित्य मंडळ. देवडीकर गाथा, चौदावी आ. २०२८ पृ.५१८